महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 29 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 300 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# माळशेज घाटातील काचेच्या पुलाची मुहूर्तमेढ



## आ. किसन कथोरे यांचा ड्रिम प्रोजेक्ट मार्गी लागणार !

मुरबाड-प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मुरबाड विधानसभा मतदारसंघातील माळशेज घाटात मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांसाठी पर्वणी ठरणारी काचेची व्हिविंग गॅलरी अर्थात काचेचा स्काय वॉक प्रकल्प सोमवार दिनांक 28 एप्रिल 2025 रोजी उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये या प्रकल्पाच्या अंमलबजावणी मध्ये कुठे अडचणी येतात त्या बाबत विचारणा करून निधीच्या तरतुदीबाबत मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत तातडीने प्रस्ताव सादर केल्यास नियोजन विभागाकडून या प्रकल्पाला तातडीने निधीची तरतूद करून शासन निर्णय काढण्यात येईल असे मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी संबंधितांना सूचना दिल्या त्यामुळे आता माळशेज घाटात काचेचा स्काय वॉक उभारण्यासाठी चालना मिळणार असून, त्यामुळे मुरबाड तालुका पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

माळशेज घाटात वर्षभर पर्यटक येत असतात, पावसाळयात येथील धबधबे आणि नैसर्गिक ढगाळ व धुके असलेल्या वातावरणाने पर्यटक याभागात अधिक संख्येने येतात.त्यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

> बोलतो ते कृतीत आणतो ; माळशेज घाटात काचेचा स्कायवॉक उभारणे हे माझे स्वप्न होते ; आज त्याला खरी दिशा मिळाली असून माझ्या मतदार संघातील नागरिकांच्या आशीर्वादाने हे शक्य झाले आहे
> ❍ आ. किसन कथोरे

माळशेज घाटात चीन देशातील काचेच्या व्हिविंग गॅलरी प्रमाणेच भव्य गॅलरी उभारण्याचा प्रस्ताव आमदार किसन कथोरे यांनी तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे सुपूर्द केला होता.

आज आयोजीत केलेल्या बैठकीसाठी, सचिव पर्यटन, सचिव, वित्त व नियोजन, सचिव वने,मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मा.जिल्हाधिकारी ठाणे मा.जिल्हा नियोजन अधिकारी ठाणे, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग ठाणे, कार्यकारी अभियंता, ठाणे सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2, अनिल घरत व इतर सर्वसबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यात पर्यटकांच्या वाढीसाठी तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी माळशेज घाटात काचेचा व्हिंहिंग गॅलरीचा प्रकल्प फायदेशीर ठरणार आहे. भारतातील हा पहिला प्रकल्प असेल. त्यामुळे मोठ्या संख्येने पर्यटक माळशेज घाटाकडे आकर्षित होऊन स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत.

# जिल्हा परिषदेची गतिमान कारभाराकडे वाटचाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २८ :** जिल्हा परिषदेच्या कार्यालयांमध्ये एखाद्या प्रस्तावावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसाठी आठ ते नऊ टप्पे लागत होते. याची दाखल घेत अवघ्या चार टप्प्यांत प्रस्तावांचा निपटारा करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचा कारभार भविष्यात अधिक गतिमान होणार आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शहापूर, मुरबाड, भिवंडी, कल्याण आणि अंबरनाथ या तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी आहे. अशातच मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ठाणे जिल्हा परिषदेचा कार्यभार हायटेक, पारदर्शक, गतिमान करण्यावर भर दिला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांच्या गुणवत्तावाढीसाठी दिशा प्रकल्पातून प्रशासनाच्या प्रयत्नांना चांगले यश आले आहे. याचबरोबर जिल्हा परिषद कार्यालयातील कामांचा वेग वाढवण्यासाठी विभाग अधिकारी, त्यांचे कार्यालय, कामाचे स्वरूप याची इत्थंभूत माहिती मिळावी, यासाठीचे नवनवीन तंत्रज्ञानही विकसित केले आहे. याचबरोबर आता मुख्यालयातील प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्याकडे विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याच अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या १८ विभागांत येणाऱ्या विविध प्रकारच्या प्रस्तावांची तपासणी आठ ते नऊ टप्प्यांत केली जात असल्याने अंतिम मंजुरीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता आता तपासणीचे टप्पे कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे बराचसा कालावधी वाचणार असून प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होईल, असा दावा जिल्हा परिषद प्रशासनाने केला आहे.

जिल्हा परिषदेत एखाद्या विभागातील कामाचा प्रस्ताव कनिष्ठ व वरिष्ठ लिपिकाकडून तपासणीनंतर सहाय्यक प्रशासन अधिकारी त्यानंतर कनिष्ठ सहाय्यक प्रशासन अधिकारी, विभागप्रमुख, वित्त विभाग, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शेवट मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी जातो; पण आता प्रत्येक विभागात येणाऱ्या प्रस्तावांचे विभाजन करण्यात येणार आहे. त्यामुळे चार टप्प्यांत तपासणी होऊन प्रस्ताव थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे अंतिम मंजुरीसाठी येणार आहे.




> **एखाद्या विभागात येणाऱ्या प्रस्तावांची संख्या लक्षात घेता, त्यांचे सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी तसेच कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिक यांच्याकडे विभागून देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रस्तावांची काटेकोरपणे तपासणी होणार आहे.**
> **- रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे**



# मैदानावरील व्यावसायिक प्रदर्शनामुळे मुले खेळांपासून वंचित

## भाजपाचे पालिका आयुक्तांना निवदेन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** शहराच्या मध्यवर्ती भागातील गावदेवी मैदान, घंटाळी मैदान, भगवती मैदान सारखी मोठी मैदान आहेत. परंतू, याठिकाणी ऐन उन्हाळी सुट्टीत भरविण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रदर्शनामुळे स्थानिक मुलांना खेळायला मैदाने उपलब्ध होत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन भाजपाचे माजी नगरसेवक सुनेश जोशी आणि मृणाल पेंडसे यांनी पालिका आयुक्त सौरभ राव यांना निवदेन देऊन स्थानिक मुलांना खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

उन्हाळी सुट्टीचा हा कालावधी असून या सुट्यांमध्ये अनेकांचा कल हा मैदानी खेळ खेळण्याकडे असतो. परंतू, अलिकडे बऱ्याच ठिकाणी मैदानेच शिल्लक राहिली नसल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे मैदानी खेळ खेळायचे तरी कुठे असा प्रश्न मुलांसमोर निर्माण होतो. ठाणे शहरात स्थानक परिसर आणि नौपाडा परिसराजवळ गावदेवी, घंटाळी आणि भगवती अशी तीन मैदाने आहेत. परंतु, ही मैदाने खेळण्यासाठी उपलब्ध होत नसल्याची खंत काही मुलांनी व्यक्त केली.

या मैदानांमध्ये वारंवार काहींना काही कार्यक्रम किंवा प्रदर्शन भरविले जात असल्याचे दिसून येते. ही बाब लक्षात घेऊन भाजपाचे माजी नगरसेवक सुनेश जोशी आणि मृणाल पेंडसे यांनी गेल्या आठवड्यात स्थानिक मुलांना घेऊन ठाणे महापालिका मुख्यालयाबाहेर क्रिकेट खेळत आंदोलन केले. ही मैदाने आठ दिवसात स्थानिक मुलांना खेळण्यासाठी मोकळी करुन दिली नाहीतर, या मुलांसोबत आयुक्तांच्या दालनात क्रिकेट खेळू असा खोचक इशारा महापालिकेला देण्यात आला होता.

दरम्यान, जोशी आणि पेंडसे यांनी सोमवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन त्यांना मुलांसाठी मैदाने उपलब्ध करुन द्यावे असे विनंतीचे निवेदन दिले. यावेळी आतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि भाजपा नौपाडा मंडल चिटणीस सुशांत फाटक हे उपस्थित होते.

फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचे निवेदननौ।ड्यातील राम मारुती रोड, गोखले रोड, स्टेशन रोड परिसरात फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. सायंकाळच्यावेळी हे फेरीवाले पदपथावर दुकानाच्या बाहेर बस्तान मांडून बसलेले पाहायला मिळतात. या फेरीवाल्यांमुळे पदपथांवरुन चालणे मुश्किल होत आहे. त्यात काही बांगलादेशी फेरीवाले ही असण्याची शक्यता असल्यामुळे या सर्व फेरीवाल्यांचे आधारकार्ड तपासून त्यांच्यावर कायमस्वरूपी कारवाई व्हावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# बदलापूर रेल्वे स्थानक फलाट बदल प्रकरण

## राजू पाटील संतप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रशासनाने फलाट क्रमांक एक बंद करुन होम फलाटाला फलाट क्रमांक एक मध्ये रूपांतरित केले. मात्र यामुळे नव्या फलाटावर मोठी गर्दी होत असून त्यामुळे प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागते आहे. दररोज जेथे कोंडीसदृश्य स्थिती निर्माण होत असून त्याच्या चित्रफिती प्रसारित होत आहे.

अशाच गर्दीची एक चित्रफित आपल्या फेसबुक खात्यावर टाकत मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी रेल्वे प्रशासनावर संताप व्यक्त केला आहे. तुम्ही कसली वाट पाहताय, असा प्रश्न विचारत पुन्हा परळ - एल्फिस्टन सारख्या एखाद्या घटनेनेच प्रशासनाला जाग येणार का असेही राजू पाटील यांनी आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे.

बदलापूर रेल्वे स्थानकात गेल्या काही दिवसात विकासकामांच्या नावाखाली विविध निर्णय रेल्वे प्रशासनाने प्रवाशांवर लादल्याचा आरोप होतो आहे. रेल्वे प्रशासनाने काही दिवसांपूर्वी जुना फलाट क्रमांक एक बंद केला. त्याचवेळी होम फलाटाला फलाट क्रमांक एक मध्ये रूपांतरित केले. फलाट क्रमांक एकवर जाळी लावली आहे. त्यामुळे ज्या फलाटावरून मुंबईसाठी आणि मुंबई हून येणाऱ्या लोकल थांबत होत्या आणि प्रवासी दोन्ही बाजूने चढत उतरत होते, ते आता बंद झाले आहे. प्रवाशांना नव्याने पश्चिमेकडील फलाट क्रमांक एकवर चढावे आणि उतरावे लागते आहे.

# माझ्या फोटोचे बेकायदा होर्डिंग आढळल्यास काढून टाका - मुख्यमंत्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहरात बेकायदा होर्डिंगचे पेव फुटले असून, न्यायालयाने दिलेले आदेश व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनाने वारंवार बेकायदा होर्डिंग लावणाऱ्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासोबत महापालिकेने दिलेले परवानगी पाहूनच होर्डिंग छापण्यात यावेत, अन्यथा संबंधितांच्या मशिन जप्त करण्यात येतील व मालमत्तांना सील लावू असा इशारा, प्रशासकांनी दिला. बेकायदा होर्डिंगसंदर्भात न्यायालयातर्फे वारंवार स्थानिक स्वराज्य संस्था, शासनावर ताशेरे ओढले जातात. त्यामुळे महापालिकेचे प्रशासक जी. श्रीकांत यांनी आज राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. बेकायदा होर्डिंग संदर्भात न्यायालयाने आदेश दिलेले असल्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी 'माझे बेकायदा होर्डिंग असतील तरी काढण्यात यावेत'असे आदेश दिले. त्यानुसार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

### सात वर्षांपूर्वी आराखडा तयार करूनही


# चिखलोलीची धरणाची उंची वाढेना ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ शहराचे हक्काचे आणि स्वतःच्या मालकीचे धरण असलेल्या चिखलोली धरणाच्या उंची वाढवण्याची योजना सात वर्षांपूर्वी हाती घेण्यात आली होती. मात्र विविध कारणांमुळे आजही धरणाची उंची वाढू शकलेली नाही. त्यामुळे अंबरनाथकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. दरवर्षी अंबरनाथकरांना पाणी कपातीला सामोरे जावे लागते. त्यामुळे यासाठी वेळीच ठोस पाऊले उचलण्याची मागणी होते आहे.

अंबरनाथ शहरासाठी नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना २०१८ साली मंजूर करण्यात आली होती. यात चिखलोली धरणाची उंची वाढवून त्यात अतिरिक्त पाणी साठा करणे अपेक्षित होते.

७१ कोटी रूपयांच्या या योजनेच्या कामाला २०१९ साली सुरूवात झाली. मे २०२० अखेर ही योजना पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते. मात्र करोनाची टाळेबंदी आणि इतर तांत्रिक समस्यांमुळे ही योजना रखडली. टाळेबंदीनंतरही निधी आणि



इतर अनेक कारणे उंची वाढीच्या आत आली.

धरणाची उंची वाढवण्याच्या कामासाठी धरण पूर्ण रिकामे करणे आवश्यक आहे. मात्र गेल्या काही वर्षात अनेकदा धरण रिकामे होण्यास वेळ लागतो. काही वर्षांमध्ये धरण रिकामे करण्यास विरोध झाला होता. शहरात पाणीटंचाईच्या झळा बसत असताना धरण रिकामे करण्याच्या निर्णयाला सहमती मिळू शकली नाही. त्यामुळे उंची वाढीचे काम रखडले होते. आता या प्रकल्पासाठी भूसंपादन आणि धरणाच्या उंची वाढीसाठीच्या ४० कोटींच्या निधीच्या प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र हा प्रस्ताव गेली काही वर्षे मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळूनही वेळेत निधी न मिळाल्याने ही योजना पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी अंबरनाथकरांना आजही पाणी कपातीला सामोरे जावे लागते आहे.

अंबरनाथ शहराला विविध स्त्रोतांच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जातो. बदलापुरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बॅरेज बंधाऱ्यातून ५० दशलक्ष लीटर, एमआयडीसीच्या जांभूळ केंद्रातून २० दशलक्ष लीटर तर चिखलोली धरणातून ६ दशलक्ष लीटर इतके पाणी पुरवले जाते. चिखलोली धरणातून ज्या भागाला पाणी दिले जाते त्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे इतर स्त्रोत नसताना किमान चिखलोली धरणाकडून अंबरनाथकरांना आशा आहे.






# गीतासार



## अध्याय ९
## राजविद्याराजगुह्ययोगः

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति । एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥ ९-२१ ॥

ते त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याई संपल्यावर मृत्युलोकात येतात. अशा रीतीने स्वर्गप्राप्तीचे साधन असणाऱ्या, तिन्ही वेदात सांगितलेल्या, सकाम कर्मांचे अनुष्ठान करून भोगांची इच्छा करणारे पुरुष वारंवार ये-जा करीत असतात. अर्थात पुण्याच्या जोरावर स्वर्गात जातात आणि पुण्य संपल्यावर मृत्युलोकात येतात. ॥ ९-२१ ॥

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ ९-२२ ॥

जे अनन्य प्रेमी भक्त मज परमेश्वराला निरंतर चिंतन करीत निष्काम भावाने भजतात, त्या नित्य माझे चिंतन करणाऱ्या माणसांचा योगक्षेम मी स्वतः त्यांना प्राप्त करून देतो. ॥ ९-२२ ॥

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः । तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ ९-२३ ॥

हे कौन्तेया (अर्थात कुंतीपुत्र अर्जुना), जे सकाम भक्त श्रद्धेने दुसऱ्या देवांची पूजा करतात, तेही माझीच पूजा करतात. परंतु त्यांचे ते पूजन अज्ञानपूर्वक असते. ॥ ९-२३ ॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च । न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ॥ ९-२४ ॥

कारण सर्व यज्ञांचा भोक्ता आणि स्वामीही मीच आहे. पण ते मला परमेश्वराला तत्त्वतः जाणत नाहीत; म्हणून पुनर्जन्म घेतात. ॥ ९-२४ ॥

यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः । भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥ ९-२५ ॥

देवांची पूजा करणारे देवांना मिळतात. पितरांची पूजा करणारे पितरांना जाऊन मिळतात. भूतांची पूजा करणारे भूतांना प्राप्त होतात आणि माझी पूजा करणारे भक्त मला येऊन मिळतात. त्यामुळे माझ्या भक्तांना पुनर्जन्म नाही. ॥ ९-२५ ॥

# रेसिपी
## मिरचीचं लोणचं



**साहित्य**

ताज्या हिरव्या मिरच्या - 3 वाट्या,मोहरी, मेथी दाणे, जिरं, बडीशेप, हळद, लाल तिखट, मीठ, तेल

**कृती -**

हिरव्या मिरच्या सर्वप्रथम स्वच्छ धुवून घ्या आणि त्यांचे देठ काढा.
मिरच्या पूर्णपणे कोरड्या होईपर्यंत सुकवून घ्या.
मिरच्या सुकल्यानंतर हव्या त्या आकारात कापून घ्या.
दुसरीकडे कढईत 1 चमचाभर तेल गरम करा
तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी, मेथी दाणे, जिरं आणि बडीशेप भाजून घ्या.
मसाले भाजून झाल्यावर ताटात काढून घ्या.
यानंतर एका मोठ्या भांड्यात चिरलेल्या मिरच्या, हळद, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करा.
भाजून घेतलेले मसाले थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक वाटून त्याची पावडर तयार करा.

# जनतेला सेवेचा अधिकार मिळवून देणारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम
## - जिल्हाधिकारी किशन जावळे

आपली सेवा आमचे कर्तव्य
YOUR SERVICE IS OUR DUTY

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : राज्यातील नागरिकांना प्रशासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा या ठरावीक मुदतीत मिळवण्याचा हक्क मिळवून देणारा कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५. या कायद्यामुळे राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

नियोजन भवन येथे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ दशकपूर्ती आणि प्रथम 'सेवा हक्क दिन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, डॉ रविंद्र शेळके,जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव,यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक सेवा देणाऱ्या अधिकारी व कार्यालयाचा गौरव करण्यात आला. महसूल विभागाने या अंतर्गत सर्वाधिक 94.36% सेवा दिल्या आहेत. तर उद्योग विभागाने 94.12 आणि कामगार विभागाने 93.53 टक्के सेवा दिल्या आहेत. यावेळी अतिउत्तम कामगिरी करणारे तहसीलदार मुरुड, माणगाव, अलिबाग यांचा प्रशस्तीपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी उपस्थित सर्वांना लोकसेवा हमीची शपथ दिली. तसेंच या कायद्याविषयी माहिती देणाऱ्या संदेशाचे लोकार्पण केले.

### थळ ग्रामपंचायत आपले सेवा केंद्र उदघाटन

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते आदर्श आपले सेवा केंद्र थळ ग्रामपंचायतचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मानसी ताई दळवी आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी संपूर्ण कामकाजाची माहिती घेतली. तसेच उपस्थित नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप केले.

# सांस्कृतिक चळवळीला चालना देणारा आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस



सांस्कृतिक कार्यक्रमामुळे नागरिक एकत्र येऊन त्यांच्याच परस्पर नाते दृढ होते. नृत्य हा असाच नागरिकांना एकत्र आणून त्यांची मोट बांधण्याचं कार्य करते. आपली संस्कृती नृत्याच्या माध्यमातून जीवंत ठेवता येते. त्यासाठी 29 एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय नृत्य दिन म्हणून साजरा करण्यात येतो. नृत्य या कला प्रकाराला चालना देण्यासाठी जागतिक नृत्य दिवस साजरा करता येतो. जागतिक नृत्य दिनाचे औचित्य साधून दरवर्षी आंतरराष्ट्रीय नृत्य समिती आणि आंतरराष्ट्रीय थिएटर संस्था ( ITI ) जगभरातील सर्व नृत्य कलावंतांना विशेष संदेश देण्यासाठी उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शक आणि नृत्य कलावंताची निवड करते.

**काय आहे आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचा इतिहास :** आंतरराष्ट्रीय थिएटर इन्स्टिट्यूट (ITI) च्या नृत्य समितीनं आंतरराष्ट्रीय नृत्य दिवसाची संकल्पना 1982 मध्ये सर्वप्रथम मांडली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय थिएटर इन्स्टिट्यूट ही संस्था UNESCO च्या कला सादरीकरणासाठी काम करते. आधुनिक बॅलेचे निर्माता जीन-जॉर्जेस नोव्हेरे (1727-1810) यांचा वाढदिवस 29 एप्रिलला पहिल्यांदा साजरा करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा केला जातो. नृत्य कलांच्या फायद्यांबद्दल जागरुकता वाढवणं आणि त्याद्वारे नागरिकांना एकत्र आणणं हा या आंतरराष्ट्रीय नृत्य दिन साजरा करण्यामागील उद्देश आहे.

काय आहे आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाचं महत्व : आनंदी जीवन जगण्यासाठी विविध कला प्रकार आयुष्यात रंग भरतात. त्यामुळे मानवी जीवनात नृत्याला मोठं महत्वाचं स्थान आहे. नृत्य हा संस्कृतीचा वारसा जपण्यात महत्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे नृत्य हा केवळ कला आणि अभिव्यक्तीचा प्रकार नसून त्याचे अनेक शारीरिक आणि मानसिक फायदे आहेत, असं या क्षेत्रातील तज्ज्ञांचं मत आहे. नृत्य तणाव कमी करण्यास मदत करते. त्यासह हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्य सुधारण्यास मदत करते. जीवनात नृत्याचे महत्व वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस महत्वपूर्ण आहे. जागतिक नृत्य दिन साजरा केल्यानं नागरिकांमध्ये नृत्याच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण होते. नागरिकांना या कला प्रकारात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केलं जाते. नृत्याचं सांस्कृतिक महत्त्व जगभरात कसं विकसित झालं, यावर प्रकाश टाकते. जागतिक नृत्य दिवस नागरिकांना एकत्र आणण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावते.

**भारतातील विविध राज्यांची नृत्ये :**

ओडिसी नृत्य प्रकार
भरतनाट्यम नृत्य प्रकार
तांडव नृत्य प्रकार
कुचीपुडी नृत्य प्रकार
कथ्थक नृत्य प्रकार
चाऊ नृत्य प्रकार
कथकली नृत्य प्रकार
मणिपुरी नृत्य प्रकार
लावणी नृत्य प्रकार

# आरटीई प्रवेशासाठी प्रतीक्षा यादी टप्पा ३ प्रवेश फेरी सुरु
## शिक्षणाधिकाऱ्यांचे पालकांना महत्त्वाचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) अधिनियम, २००९ नुसार, यंदाही २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवली जात आहे. आज, दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी प्रतीक्षा यादी टप्पा क्रमांक ३ मधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया दि. २८ एप्रिल २०२५ ते दि. ७ मे २०२५ या कालावधीत पूर्ण करायची आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेशासाठी आवश्यक असलेली माहिती SMS द्वारे पाठवली जात आहे. मात्र पालकांनी केवळ SMS वर अवलंबून न राहता, आरटीई पोर्टलवरील 'अर्जाची स्थिती' या टॅबवर आपल्या बालकांचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची स्थिती नियमितरित्या तपासावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

प्रतीक्षा यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी अलोटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन दस्तऐवजांची तपासणी करून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांची पडताळणी दि. ७ मे २०२५ पर्यंत पूर्ण करावी लागेल.

ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती आणि महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ६२७ पात्र शाळांमध्ये ११,३२० रिक्त जागा उपलब्ध होत्या. आतापर्यंत ८,३५८ प्रवेश पूर्ण झाले आहेत. प्रतीक्षा यादी टप्पा ३ अंतर्गत उर्वरित रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# रेल्वे स्टेशनमधील चहा विक्रेत्यांवर वैधमापन विभागाची धाड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : कोकण विभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या रेल्वे स्थानकावरील स्टॉलवर चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री होत असते. सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र कोकण विभागचे शिवाजी काकडे, यांच्या सूचनेवरून नूकतिच कारवाई करण्यात आली.

तसेच ठाणे जिल्हयातील कल्याण व ठाणे, पालघर जिल्हयातील वसई, रायगड जिल्हयातील पनवेल व कर्जत, रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण व रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ या रेल्वे स्टेशनवर संबंधित जिल्हा उपनियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांनी अचानक भेटी देवून नूकतिच कारवाई करण्यात आली. वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये तपासणी केली.

रेल्वे स्टेशनवरील चहा विक्री करणाऱ्या आस्थापनांना १५०/१८० मिली एवढी घोषित प्रमाण असताना तपासणीमध्ये ३० ते ८० मिली एव्हढा चहा कमी देत असल्याचे आढळून आले. अश्या एकूण ७ आस्थापनांवर वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये प्रकरण दाखल करण्यात आले. वापरात असलेली तोलन उपकरणे विहित मुदतीत फेर पडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्यामुळे ०४ प्रकरणे दाखल करण्यात आली. चिपळूण व रत्नागिरी स्टेशन वरील आस्थापनेवर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आवेष्टित वस्तूवर नियमातील तरतूदीन्वये आवेष्टनावर घोषवाक्य नमूद न केल्यामूळे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. अशी माहिती पत्रकान्वय कोकण विभागाचे सह नियंत्रक,वैध मापन शास्त्राचे शिवाजी काकडे यांनी दिली.

# बुद्धिबळ स्पर्धेत डोंबिवलीच्या होली एंजल्स तर बॅडमिंटनमध्ये कल्याणच्या सेंट लॉरेन्स शाळेचे वर्चस्व



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'कल्याण ट्रॉफी डिस्ट्रिक्ट गेम्स' अंतर्गत कल्याणमध्ये सुरू असलेल्या स्पर्धेमध्ये बुद्धिबळ स्पर्धेत डोंबिवलीच्या हॉली एंजल्स शाळेने तर बॅडमिंटन स्पर्धेमध्ये कल्याणच्या सेंट लॉरेन्स शाळेने वर्चस्व प्रस्थापित केले. कल्याणच्या होली फेथ शाळेमध्ये संपन्न झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये होळी एंजलच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत 4 सुवर्ण 3 रोप्य 2 कांस्यपदक पटकावत स्पर्धेत आघाडी घेतली.बॅडमिंटन स्पर्धेमध्ये कल्याणच्या सेंट लॉरेन शाळेने 5 सुवर्ण 3 रोप्य आणि 7 कास्य पदक पटकावत बाजी मारली. कल्याण ट्रॉफी डिस्टिक गेम्स अंतर्गत सुरू असलेल्या विविध स्पर्धेमध्ये ठाणे जिल्ह्यातील अनेक शाळा सहभाग घेऊन स्पर्धेला उदंड प्रतिसाद देत आहेत. या खेळांचे आयोजन स्पोर्ट्स केयर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले असून 1 मे पर्यंत हे डिस्टिक गेम्स चालणार आहेत. यामध्ये फुटबॉल, क्रिकेट, ॲथलेटिक्स स्केटिंग, हॉलीबॉल, रब्बी या खेळांचा समावेश करण्यात आला आहे. कल्याण-डोंबिवलीमधील विविध शाळा आणि मैदानावर हे जिल्हा पातळीवरचे खेळ पार पडणार आहेत. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होली फेथ शाळेचे संचालक सुमित पालीवाल यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका रेशमी, क्रीडा शिक्षक राजू घुले, शलाका दातार, कोमल आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेला सुधांशू ठाकूर, आदित्य शेजवळ, अश्विनी, रुपेश यांचे सहकार्य लाभले.बॅडमिंटन स्पर्धेत ओमकार भगत, निश्चित शेट्टी, सिद्धार्थ गांगुर्डे, आयुष कटके, इशिका जैस्वाल, दीक्षा सफारे, विधीता कश्यप, श्रेया परदेशी, अंश खेमाने, लक्ष लिंबाजी हे खेळाडू विजयी झाले आहेत. तर बुद्धिबळ स्पर्धेत पार्थ बिरूद, अनिस कदम, दिवंशिका सिंग, राजदीप येवले, श्रीयान वारुळे, ऋग्वेद म्हात्रे, लक्ष खाडे, ध्रुव नांदगावकर, सर्वेश चौधरी तनिष्का तिवारी, अथर्व दामोदर, घुमरे, निधी सावलिया, व्हेज शेट्टी, मिहिरा बापला परिणीती उदगीर, खुशी शाहू, पलक कटारिया आदी खेळाडू विजयी झाले आहेत.

# मुरबाड ग्रामीण जंगलातील डोंगरच्या काळया मैनेला आलाय बहर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील आदिवासी पट्ट्यात तसेच ग्रामीण भागात विशेषत मुरबाडच्या जंगलात गर्द पानांनी नटलेली करवंदीची जाळी हिरव्या काळया टपोरी फलांनी भरली असून डोंगरची काळी मैना बाजारात दाखल झाली आहे.

मुरबाड तालुक्यात आदिवासी स्थानिक लोक ही करवंदे जमा करून बाजारात पळसाच्या पानांच्या (डोंबे )वाटे करून विकतात.

मुरबाड -माळशेज घाट रस्त्यावर आदिवासी महिला उपजीविकेसाठी या रानमेव्याचा व्यवसाय करतात. आंबट, गोड, तुरट चव असलेली करवंदे रोग प्रतिकार शक्ती वाढवणारी औषधी गुणधर्म असलेली नैसर्गिकी व पौष्टिक असतात. परंतु जंगलात वनव्यामुळे करवंदीची झाडे जळून राख होत आहे त्यामुळे ज्या ठिकाणी जंगलाला वनवा लागला नाही त्या जंगलात डोंगरची काळी मैना बहरली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

करवंदामध्ये नैसर्गिकरित्या कॅल्शियम भरपूर प्रमाणात असल्यामुळे हाडांच्या मजबुतीसाठी त्यांचा उपयोग होतो विषमुक्त फल म्हणून या फुलाला विशेष मागणी आहे. काही प्रयोगशील शेतकऱ्यांनी संकरित व भरपूर उत्पन्न देणाऱ्या जातींची लागवड करवंदीची करून व्यवसाय उभा केला आहे करवंदापासून चटणी, सरबत, जाम, जेली बनविता येते.

शासनाच्या वतीने आदिवासी बांधवांना जर करवंदापासून टिकाऊ पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण दिले तर रोजगारचे नवीन साधन निर्माण होईल व ग्राहकांना करवंदीची चव वर्षभर घेता येईल. मुरबाड तालुक्यातील उंबरवाडीचे माजी सरपंच चिमण खंडवी यांनी दिली आहे.

> *** जर योग्य वेळी वन खात्याने वनवा विझवण्यासाठी चांगले उपयोजना केली तर निश्चितच डोंगरची काळी मैना सुरक्षित राहील.**
> *** ज्या ठिकाणी जंगलाला वनवा लागला नाही त्या ठिकाणी करवंदीची झाडे बहरली असून त्यामुळे झाडावरील करवंदे काढून आदिवासी बांधव प्रमुख बाजारात त्याची विक्री करतात त्यावर आपला उदरनिर्वाह चालत आहे.**
> **- चिमण खंडवी ,माजी सरपंच,उंबरवाडी/मुरबाड**

# त्या जागेबाबतची दाखल जनहित याचिका हायकोर्टाने कायमस्वरूपी काढली निकाली
## जिल्हाधिकाऱ्यांनाच दिले पुन्हा चौकशीचे आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : दोन व्यक्तींनी जिल्हाधिकारी आणि आयुक्तांकडे तक्रार केली होती की कल्याण पूर्वेतील डावखर एलिगन्स ज्या मध्ये 200 कुटुंब राहत आहेत ज्याची 2023 ला ओसी मिळालेली आहे अशी बिल्डिंग संरक्षण जमिनीवर बांधली गेली आहे. मात्र या जागेबाबतची दाखल जनहित याचिका हायकोर्टाने कायमस्वरूपी निकाली काढली असून जिल्हाधिकाऱ्यांनाच पुन्हा चौकशीचे आदेश दिले आहेत.

सर्व गोष्टींचा आढावा घेतल्यानंतर जिल्हाधिकारी आणि आयुक्त दोघांनीही पहिल्याच सुनावणीमध्ये एक लेखी आदेश जारी केला होता ज्यामध्ये ही मालमत्ता खाजगी मालकीची असल्याची पुष्टी करण्यात आली होती. असा अहवाल 5 नोव्हेंबर 2020 रोजी डिफेन्स डिपार्टमेंटला देखील पाठवण्यात आला होता. तसेच आमदारांनी देखील अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता ज्याला महसूल विभागाने उत्तर देखील त्यावेळी दिले होते. या अहवालानुसार परिसरातील 220 हुन अधिक भूखंड आणि 72 वरून अधिक इमारतींचा समावेश आहे. तरी देखील त्या व्यक्तींनी माननीय उच्च न्यायालयात जाणीवपूर्वक डावखर एलिगन्स प्रकल्पालाच लक्ष करून जनहित याचिका दाखल करून प्रकरण आणखी वाढवले.

हायकोर्टाकडून ही जनहित याचिका देखील कायमची रद्द करण्यात आली असून न्यायालयाने जिल्हाधिकारी आणि आयुक्तांना तांत्रिक बाबी लक्षात घेऊन जमिनीची सविस्तर पुनर तपासणी करण्याचे आणि तक्रारदार आणि संबंधित पक्षांना अंतिम निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत. निकाल लागेपर्यंत कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू नये. योग्य मार्गाने प्रक्रिया सुरू आहे. सत्य लवकरच समोर येईल. असा विश्वास डावखर समुहाने व्यक्त केला आहे. डावखर एलिगन्स संबंधित 1928 पासून जमिनीच्या सर्व नोंदी पडताळणीसाठी उपलब्ध आहेत. सरकारने जारी केलेल्या 97 वर्षाच्या नोंदीप्रमाणे स्पष्ट आणि निर्विवाद मालकी दिसून येते. तरीदेखील या कागदपत्रांची तपासणी करण्यास इच्छुक असलेले कोणीही वैभव कोल्हे यांच्याशी वेळ निश्चित करून भेटू शकतात.जमिनीचे हक्क निश्चित करण्याचा अधिकार केवळ महसूल विभागाकडे आहे, ज्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांचा देखील समावेश असतो. तसेच पूर्वी जे भूखंड भाडेतत्त्वावर दिले गेले होते तो निर्णय देखील आता रद्द करण्यात आला आहे. शिवाय डावखर ग्रुप विरुद्ध जाणीवपूर्वक खोटे आरोप करणाऱ्या दोन व्यक्तींच्या विरोधात कल्याण न्यायालयात □7 कोटींचा मानहानीचा दावा दाखल करण्यात आला आहे. कोणतीही तडजोड केली जाणार नाही. कायदेशीर पद्धतीनेच उत्तर दिलं जाईल असे डावखर समुहाने सांगितले आहे.

# आयुक्त अभिनय गोयल यांची टिटवाळ्यातील नवउद्यानाला भेट



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : टिटवाळा, नारायण नगर येथे 3500 चौ मी क्षेत्रफळावर विकसीत करण्यात आलेल्या उद्यानाची महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पाहणी केली आणि तेथील सुमारे 3500 झाडांची लागवड केलेले मानवनिर्मित जंगल , लहान मुलांसाठी बसविण्यात आलेली खेळणी आणि जेष्ठ नागरिकांकरिता उपलब्ध केलेली व्यायामाची साधने इ. सुविधांचा आढावा घेतला आढावा .सदर उद्यान लवकरच नागरिकांसाठी खुले होणार आहे. यावेळी मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव उपस्थित होते.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांवर कारवाईचा बडगा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे:** घोडबंदर मार्गावरील गायमुख घाटात रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असतानाही काही वाहन चालकांनी विरुद्ध दिशेने वाहतुक करत वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अशा ३४ वाहन चलाकांविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहतुक पोलिसांनीच या प्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर हा गुन्हा दाखल झाला. उरण येथील जेएनपीटी बंदरातून हजारो अवजड वाहने गुजरातच्या दिशेने वाहतुक करतात. तसेच हलक्या वाहनांची वाहतुक होत असते. बोरीवली, वसई किंवा मिरा भाईंदर या भागात वाहतुक करणाऱ्या राज्य परिवहन सेवा, महापालिका परिवहन सेवेच्या बसगाड्या देखील येथूनच वाहतुक करतात.

या मार्गावर पावसाळ्यात खड्डे पडत असल्याने वाहतूक कोंडी होते. मार्गावरील गायमुख भागातील रस्ता हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या घाटातून जातो. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कामासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी या मार्गावर वाहतुक बदल लागू केले आहेत. शनिवारी या भागात दुरुस्ती कामामुळे कोंडी झाली होती.

वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पोलिसांकडून टप्प्याटप्प्याने वाहतुक सोडली जात होती. परंतु बेशिस्त वाहन चालकांकडून विरुद्ध दिशेने वाहतुक होत असल्याने कोंडीत भर पडली होती. अखेर पोलिसांनी या वाहन चालकांविरोधात कठोर कारवाईचा बडगा उगारला.

विरुद्ध दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांच्या वाहनाचे क्रमांक नोंद करुन त्यांच्याविरोधात पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे. अशा ३४ वाहन चालकांविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. मोटरवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ नुसार हा गुन्हा दाखल झाला आहे.

# रस्त्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील खडकपाडा महावीर नगरी समोरील परिसरात डीपी रस्ता आहे. या रस्त्याच्या बाजूला गटारे आणि फुटपाथ बांधून झाला आहे. परंतु बिल्डर रस्त्यावरील पत्रे काढत नाही. वारंवार तक्रार करून देखील अद्याप रस्ता खुला केला गेला नाहीये. या परिसरात तीन मोठे हॉस्पिटल आहेत. मुलांची शाळा आहे. तक्रार करून देखील महापालिकेकडून दुर्लक्ष केल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे शाखा प्रमुख मोहन म्हात्रे यांनी पदाधिकाऱ्यांसह हा रस्ता पूर्ण करण्यासाठी लाक्षणिक उपोषण केले. यावेळी केडीएमसी प्रशासनाने लवकरात लवकर हा रस्ता पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी सचिन बासरे, वंडार कारभारी, माजी नगरसेवक उमेश बोरगावकर, विजय काटकर, रवींद्र कपोते आदी पदाधिकारी उपस्थित होते.




खडकपाडा वायले नगर ब प्रभाग क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या या नगरी महावीर हाईटस समोरील मुख्य डि. पी. रस्ता अपूर्ण अवस्थेत सोडण्यात आला आहे. याठिकाणी जागा मालकाने डी.पी. रोडच्या जागेत निळे पत्रे मारुन ठेवले आहेत. या डि. पी. रोडचे जागा मालक जगदीश गुप्ता हे पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. परंतु डि. पी. रोडसाठी जागा दिल्यानंतर फेरीवाले अतिक्रमण करुन जागा ताब्यात घेतात केडीएमसीचे संबंधित अधिकारी लेखी स्वरुपात हमी देत असतील कि, कोणतेही फेरीवाल्यांचे अतिक्रमण होणार नाही तरच मी डी.पी. रस्त्याकरीता जागा देण्यास तयार आहे. असे असताना देखील केडीएमसी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शाखा प्रमुख मोहन म्हात्रे यांनी केला आहे.

या बाबत वेळोवेळी अर्ज निवेदन दिल्यानंतरही प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. या अपूर्ण डि.पी. रस्त्यामुळे वाहतुक कोंडी, ध्वनी प्रदुषण, त्यातच वाढत्या फेरीवाल्यांची संख्या यामुळे या परीसरातील सर्व नागरीक त्रस्त असुन केव्हाही मोठा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी हे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी प्रशासनाच्या आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

# देवघरातील दिवा अंगावर पडला

## गंभीर भाजलेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली:** घरात देवाची पूजा करत असताना दिव्याची पेटती वात अंगावर पडून डोंबिवली पूर्वेतील पिसवली भागातील एक महिला गंभीररित्या भाजली होती. या महिलेवर जवळच्या आणि त्यानंतर डोंबिवली एमआयडीसीतील एका रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात आले. परंतु, ही महिला गंभीररित्या भाजली असल्याने उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. शनिवारी ही घटना घडली आहे.

अर्चना धर्मेंद्र कुमार (४८) असे मयत महिलेचे नाव आहे. ही महिला आपल्या कुटुंबीयांसह डोंबिवली पूर्वेतील पिसवली भागातील दुर्गामाता मंदिर भागात राहत होती. या मृत्युप्रकरणी महिलेचा पती धर्मेंद्र कुमार यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली.

पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद करून घेतली आहे. मृत महिलेचे पती धर्मेंद्र कुमार यांनी मानपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आपली पत्नी अर्चना कुमार ही शनिवारी सकाळी घरात देवपूजा करत होती.

# धोकादायक फांद्यांची छाटणी मे अखेर पूर्ण करणार

## - ठाणे मनपाचा दावा ■ ६३६७ झाडांपैकी २७५३ झाडांच्या फांद्याची छाटणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** ठाणे महापालिका क्षेत्रात पावसाळ्यात झाडांच्या धोकादायक स्थितीत असलेल्या फांद्या पडून जिवित तसेच वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने एप्रिल महिन्यापासूनच झाडांच्या फांद्या छाटणीची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत आतापर्यंत ४५ टक्के म्हणजेच ६३६७ झाडांपैकी २७५३ झाडांच्या फांद्याची छाटणी करण्यात आली असून उर्वरित झाडांच्या फांद्याची छाटणीची कामे मे महिनाअखेर पुर्ण करणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात वृक्ष उन्मळून पडतात. तसेच झाडांच्या धोकादायक स्थितीत असलेल्या फांद्याही पडतात. अशा घटनेत यापुर्वी शहरात काही नागरिकांना आपला



जीव गमावावा लागला आहे. तसेच वाहनांवर झाडांच्या फांद्या पडून वाहनांचे नुकसान होते. त्यामुळे असे प्रकार टाळण्यासाठी दरवर्षी ठाणे महानगरपालिकेतर्फे पावसाळ्यापूर्वी झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी केली जाते. यावर्षी नियोजित वेळेच्या दोन महिने आधीपासूनच धोकादायक फांद्या काढण्याच्या मोहीमेची सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेत आतापर्यंत ६३६७ झाडांपैकी २७५३ झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्यात आल्या आहेत. हे प्रमाण सरासरी ४५ टक्के एवढे आहे.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, महापालिका क्षेत्रातील प्रमुख रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, शाळा, रुग्णालये, उद्याने, चौक, बस स्टॉप आणि रहिवासी परिसरातील धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत आहे. पावसाळ्यात विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्यांचा संपर्क होवून अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन तांत्रिक दृष्टीने ही छाटणी केली जात आहे.

त्यासाठी प्रभाग समितीनिहाय सर्वेक्षण करण्यात आले असून सुमारे ६३६७ झाडांच्या धोकादायक फांद्या काढण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व प्रभाग समिती क्षेत्रात ही मोहिम सुरू आहे. यामध्ये आतापर्यंत नौपाडा-कोपरी (३५ टक्के), उथळसर (४० टक्के), लोकमान्य नगर-सावरकर नगर (४२ टक्के), वागळे (३५ टक्के), माजिवडा-मानपाडा (६० टक्के), वर्तकनगर (४८टक्के), कळवा (४६ टक्के), मुंब्रा (६३ टक्के) आणि दिवा (२४ टक्के) इतकी कामे झाली आहेत. झाडांच्या धोकादायक फांद्या काढणे आणि अतिरिक्त पर्णभार कमी करण्याचे एकूण सरासरी प्रमाण ४५ टक्के एवढे आहे. उर्वरित काम मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचेही वृक्ष अधिकारी सोनावणे यांनी सांगितले.

उन्हाळ्यात झाडांच्या सावलीचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांना मिळावा आणि झाडांची नैसर्गिक वाढ अबाधित रहावी, यासाठी अत्यावश्यक असेल तेथेच धोकादायक फांद्यांची छाटणी केली जात आहे. तसेच, वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभागातील माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांच्याशीही या मोहिमेबाबत संपर्क साधण्यात येत आहे. त्यांच्याशी समन्वय साधून आवश्यक त्या ठिकाणी झाडांच्या धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात येत आहे.




# दिवाळीपूर्वी पाच हजार घरांची सोडत

## घरांची माहिती मात्र गुलदस्त्यातच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या सोडतीच्या प्रतिक्षेतील मुंबईकरांना लवकरच दिलासा मिळणार आहे. दिवाळीपूर्वी, अर्थात आक्टोबरमध्ये मंबईतील ५ हजार घरांसाठी सोडत काढण्याचे नियोजन मुंबई मंडळाने केले आहे. सोडतीची, सोडतीतील घरांची संख्या जाहीर करण्यात आली असली तरी घरे कोणत्या परिसरात, कोणत्या उत्पन्न गटासाठी असणार याचे तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत.

मुंबईतील म्हाडाच्या घरांना सर्वाधिक मागणी असते. त्यामुळेच मुंबईतील म्हाडाच्या घरांच्या सोडतीला मोठ्या संख्येने अर्ज सादर होतात. त्यातही अत्यल्प आणि अल्प गटातील घरांना प्रचंड प्रतिसाद मिळतो. मुंबईसारख्या महागड्या शहरात परवडणाऱ्या दरात हक्काची घरे घेण्यासाठी सर्वसामान्यांना म्हाडा हाच एकमेव पर्याया आहे. त्यामुळे अनेकांचे लक्ष म्हाडाच्या घरांच्या सोडतीकडे लागले असते.

दरम्यान २०१८ नंतर मुंबई मंडळाने थेट २०२३ मध्ये ४०८२ घरांसाठी सोडत काढली होती. या सोडतीत अत्यल्प आणि अल्प गटासाठी सर्वाधिक घरे होती. त्या सोडतीली उत्तम प्रतिसाद मिळाल. २०२४ मध्येही काही घरांसाठी सोडत काढण्यात आली. आता दिवाळीपूर्वी मुंबईतील घरांसाठी सोडत काढण्यात येईल आऑक्टोबरमध्ये ५ हजार घरांसाठी सोडत होईल असे म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी सांगितले.

ही ५ हजार घरे नेमकी कुठे असतील, कोणत्या उत्पन्न गटासाठी असतील याविषयी त्यांना विचारले असता त्यांच्याकडून कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. मुंबई मंडळात सध्या काम सुरु असलेली आणि येत्या वर्षभरात पूर्ण होणारी घरे ५ हजार नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे या पाच हजार घरांमध्ये वर्षभरात पूर्ण होणाऱ्या घरांसह पत्राचाळीतील निर्माणाधीन घरांचा समावेश असण्याची शक्यता आहे. पत्राचाळीत सध्या अल्प, मध्यम आणि उच्च गटासाठी २३८९ घरांची कामे सुरु आहेत. ती पूर्ण होण्यासाठी चार वर्षांचा अवधी लागणार आहे. पण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आक्टोबर २०२५ च्या सोडतीत या घरांचीही समावेश होण्याची शक्यता आहे.

माहिती अधिकाराखाली नागरिकांना, म्हाडा विजेत्यांना, भाडेकरूंना आवश्यक ती माहिती मिळवावी लागते. यात बराच वेळ जातो. तर अधिकारी-कर्मचार्यांचा ही वेळ या जातो. ही बाब लक्षात घेत म्हाडाने पारदर्शक कारभाराच्यादृष्टीने म्हाडाशी संबंधित १५ कोटी कागदपत्रे सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे.

स्कॅन केलेली ही कागदपत्रे म्हाडाच्या नवीन अधिकृत संकेतस्थळावर कोणालाही पाहता येतील. मात्र त्याची प्रत काढता येणार नाही किंवा त्यात काही बदलही करता येणार नाही. म्हणजेच ही कागदपत्रे केवळ वाचनासाठी असतील. संवेदशनील विषयाची संबंधित कागदपत्रांचा मात्र यात समावेश नसणार आहे. त्याचवेळी म्हाडाच्या सर्व मंडळांच्या माहितीसह प्रकल्पांची माहिती, इतर माहितीही आता संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे.

# मुंबईतील पाकिस्तानी नागरिकांनी देश सोडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी देण्यात आलेली मुदत संपताच मुंबई पोलिसांच्या कारवाईला वेग आला आहे. मुंबईत राहणाऱ्या १७ पाकिस्तानी नागरिकांना मुंबई पोलिसांनी एक्झिट परमिट दिल्यानंतर त्यांनी देश सोडल्याची माहिती सूत्रांनी दिली. अल्पकालीन व्हिसावर तसेच पर्यटनासाठी हे पाकिस्तानी नागरीक भारतात आले होते.

एकूण १७ पाकिस्तानी नागरिक नोटीस मिळाल्यानंतर मायदेशी परतले आहेत. वैद्यकीय व्हिसावर आलेल्या पाकिस्तानी नागरिकांव्यतिरिक्त इतर सर्व पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी दिलेली मुदत रविवारी रात्री (२७ एप्रिलला) संपुष्टात आली होती. तसेच वैद्यकीय व्हिसाधारक पाकिस्तानी नागरिकांना २९ एप्रिलपर्यंत देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पहलगाम हल्ल्यानंतर सरकारने पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जायला सांगितले होते.

त्यानुसार, सार्क व्हिसा असलेल्यांना २६ एप्रिलपर्यंत भारत सोडून जाण्यास सांगण्यात आले, वैद्यकीय व्हिसावरील नागरिकांना २९ एप्रिलपर्यंत परत जायचे आहे तर १२ प्रवर्गातील व्हिसाधारकांसाठी रविवारची मुदत होती. त्यात आगमनानंतर व्हिसा, व्यवसाय, चित्रपट, पत्रकार, ट्रान्झिट, परिषद, गिर्यारोहण, विद्यार्थी, अभ्यागत, गट पर्यटक, यात्रेकरू आणि गट यात्रेकरू यांचा समावेश आहे. मुंबई पोलिसांनी केंद्र सरकारच्या घोषणेनंतर तात्काळ सर्व पाकिस्तानी नागरिकांना नोटीस बजावण्यास सुरूवात केली होती.

दीर्घ मुदतीचा व्हिसा, राजनैतिक किंवा अधिकाऱ्यांसाठी दिला जाणारा व्हिसा असणाऱ्यांना देश सोडून जाण्याच्या आदेशातून वगळण्यात आले आहे. दरम्यान, अल्पमुदतीच्या व्हिसावरील सर्वाधिक १,००० पाकिस्तानी नागरिक महाराष्ट्रात आहेत. तसेच जवळपास ५,०५० पाकिस्तानी नागरिक दीर्घमुदतीच्या व्हिसावर राज्यात राहात आहेत. मुंबईतही १७ पाकिस्तानी नागरिक होते. कोणीही पाकिस्तानी नागरिक बेपत्ता, गायब किंवा हरविलेला नाही. रविवारी किंवा सोमवारी सायंकाळपर्यंत सर्व पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात पाठविले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले होते.

# कारशेडसाठी झाडांची कत्तल रोखण्यासाठी स्वाक्षरी मोहीम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मेट्रो कारशेडसाठी सुमारे दहा हजार झाडांवर कुऱ्हाड चालवण्याचा प्रशासनाचा निर्णय समोर आला असून, त्याविरोधात शहरातील पर्यावरणप्रेमींनी स्वाक्षरी मोहिमेचा मार्ग अवलंबला आहे. आतापर्यंत या मोहिमेत सहा हजाराहून अधिक नागरिक सहभागी होत स्वाक्षरी करून आपला विरोध दर्शविला आहे.

मेट्रो प्रकल्प क्रमांक ९ अंतर्गत, भाईंदरच्या डोंगरी भागात कारशेड उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या कामासाठी बांधकाम परवानगीदेखील देण्यात आली आहे. मात्र, या कारशेडसाठी एमएमआरडीएने ११,३०६ झाडे तोडण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी १,४०६ झाडे आधीच




तोडण्यात आली असून उर्वरित ९,९०० झाडांच्या तोडासाठी मिरा-भाईंदर महापालिकेने १२ मार्च रोजी जनतेसाठी सूचना प्रसिद्ध केली होती. यावर हजारो नागरिकांनी हरकती नोंदवल्या आहेत. या संदर्भातील सुनावणी प्रक्रिया नुकतीच ११ एप्रिल रोजी पूर्ण झाली आहे. मात्र, नागरिकांच्या विरोधानंतरही कारशेड उभारण्याच्या शासनाच्या भूमिकेत फारसा बदल दिसून येत नाही. त्यामुळे या निर्णयाविरोधात आवाज उठवण्यासाठी पर्यावरणप्रेमींनी स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. या नुकताच मीरा भाईंदर शहरात प्रमुख रहदारीच्या ठिकाणी राबविण्यात आली होती. या मोहिमेत वृक्ष तोडीला विरोध दर्शविण्यासाठी सहा हजाराहून अधिक नागरिकांनी सहभागी होत स्वाक्षरी केली आहे.

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. हळूहळू पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्यातच वृक्ष तोड करण्याचे प्रकार सुरू आहेत याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. या मोहिमेतून जनजागृती करत, पुढे न्यायालयात दाद मागण्याचा संकल्प पर्यावरण कार्यकर्त्यांनी केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# एनएमएमटीची विद्युत बस सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** एनएमएमटी व्यवस्थापनाने उरणच्या मार्गावर विद्युत बस सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली होती. त्यानुसार मंगळवारपासून उरण ते कोपरखैरणे या मार्गावरील विद्युत बस सुरू झाली आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात उकाड्याने त्रस्त झालेल्या प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

उरणमध्ये उरण ते नेरुळ/बेलापूर ही लोकल सेवा सुरू झालीं असली तरी अनेक प्रवासी हे एनएमएमटी बसने प्रवास करीत आहेत. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या



एनएमएमटी बस सेवेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे. मात्र उरणमध्ये येणाऱ्या बस या नादुरुस्त व जुन्या आहेत. त्यामुळे नागरिकांना व प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

एनएमएमटी बससेवा ही उरणमधील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विशेषतः नवी मुंबईत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची ठरत आहे. काही महिने बंद असलेली ही सेवा पूर्ववत सुरू करण्यात आली आहे. मात्र या बसची संख्या अपुरी आहे. त्यामुळेही प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गावरील बस संख्येतही वाढ करण्यात यावी त्याचप्रमाणे विद्यद्युत बस सेवाही सुरू करण्यात यावी अशी मागणी उरणमधील प्रवाशांनी केली होती. जुईनगर ते कोप्रोली वशेणी ही वातानुकूलित सेवा खोपटे येथील अपघातानंतर बंद करण्यात आली होती. ती पुन्हा सुरू करण्याची मागणी येथील सामाजिक संस्था आणि नागरिकांनी केली आहे.

पाठपुराव्यानंतर बससेवा पूर्ववत

एनएमएमटी बससेवा ही शहरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे. ही सेवा काही महिने बंद करण्यात आली होती. ही बससेवा सुरू करावी या मागणीसाठी आंदोलनही करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त, परिवहन विभाग आदींना निवेदनेही देण्यात आली होती. वारंवार मागणी आणि पाठपुरावा केल्यानंतर ही सेवा पूर्ववत करण्यात आली.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



# ऑनलाईन प्रणालीचा नागरीकांनी लाभ घ्यावा - केडीएमसीचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम 2015 बाबत जास्तीत जास्त नागरिकांना माहिती उपलब्ध व्हावी, या अनुषंगाने शासनाने दि. 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून घोषीत केला आहे. या पार्श्वभूमीवर आज महापालिका मुख्यालयात सेवा हक्क दिनानिमित्त महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, उप आयुक्त वंदना गुळवे, रमेश मिसाळ, स्वाती देशपांडे, प्रसाद बोरकर, संजय जाधव, कार्यकारी अभियंता जगदिश कोरे, इतर अधिकारी वर्ग व महापालिका कर्मचारी वर्ग तसेच विविध संस्थाचे प्रतिनिधी, नागरिक यांनी सेवा हक्क दिनाच्या अनुषंगाने शपथ ग्रहण केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, उप आयुक्त वंदना गुळवे यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम 2015 बाबत उपस्थितांना माहिती विषद केली.कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत एकुण 114 सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून, यापैकी 33 सेवा नागरिकांसाठी पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध आहेत आणि उर्वरित सेवा पुर्णपणे ऑनलाईन करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. या सेवा कालबध्द पध्दतीने देणे गरजेचे असून, याबाबत दि. 2 एप्रिल 2025 रोजी पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, व्दितीय अपिलीय अधिकारी यांस प्रशिक्षण देण्यात आले असून, लवकरच द्वितीय प्रशिक्षण देखील संबंधित अधिकारी वर्गास देण्यात येईल, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या उपआयुक्त वंदना गुळवे यांनी यावेळी दिली.

यावेळी महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणातील डिजीटल स्टॅन्डीवर महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम 2015 बाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे उपलब्ध सेवांची माहिती प्रदर्शित करण्यात आली. महापालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये सेवा हक्क दिनानिमित्त शपथ घेण्यात आली. तसेच महापालिका परिक्षेत्रातील शाळांमध्ये देखील शिक्षक व विद्यार्थी वर्गामध्ये सेवा हक्क दिनानिमित्त जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे या अधिनियमाच्या जनजागृतीसाठी महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत विविध शाळांमध्ये निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

## कल्याण मनपा बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्थेच्या वतीने
# संयुक्त जयंती महोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था (रजि.) कल्याण जयंती समिती आयोजित भारतीय संविधान अमृत वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव मंगळवार २९ एप्रिल व बुधवार दि. ३० एप्रिल रोजी सकाळी १० ते रात्री ११ वाजेपर्यंत महापालिका मुख्यालय व आचार्य प्र. के. अत्रे रंगमंदिर, कल्याण (प.) येथे विविध कार्यक्रम घेऊन आयोजित केला आहे.

प्रबोधन सत्र, नृत्य स्पर्धा, चित्रप्रदर्शन, आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी, भव्य रक्तदान शिबिर मंगळवारी महापालिका मुख्यालय येथे होणार असून बुधवारी आचार्य प्र. के.अत्रे रंगमंदिर येथे देशभक्तिपर व महापुरुषांच्या जीवन कार्यावर नृत्य स्पर्धा सहभाग सर्व महापालिका क्षेत्रातील स्पर्धकांसाठी खुली स्पर्धा आयोजित केली आहे. ज्ञानसूर्य गुणवंत विद्यार्थी पुरस्कार, कर्मचारी खेळाडू सन्मान, संत गाडगे महाराज स्वच्छता कर्मचारी पुरस्कार, आंबेडकरी चळवळीत शाहिरी योगदान पुरस्कार, प्रशासनातील आंबेडकरी चळवळीतील योगदान बदल अधिकारी-कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा बुधवारी रात्री ८:३० वाजता अत्रे रंगमंदिर येथे आयोजित केला आहे. यावेळी प्रबोधन कला मंच शाहिरी जलसा विवेकी विचारांचा जागर. सादरकर्ते शितल भंडारे आणि संच मुंबई हे देखील सादरीकरण करणार असल्याची माहिती संस्था अध्यक्ष चंद्रकांत पोळ यांनी दिली.

# भाजपा शिक्षक आघाडीची सहविचार सभा संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभाग यांच्या वतीने कोकण विभाग पदवीधर आमदार निरंजनजी डावखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षकांच्या विविध समस्या संदर्भात सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षकांच्या व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या विविध समस्या संदर्भात चर्चा करण्यात आली. शिक्षक आणि शिक्षकेतरांची प्रलंबित सर्व कामे ही लवकरात लवकर मार्गी लावण्या संदर्भात निरंजनजी डावखरे यांनी आग्रही भूमिका मांडली. प्रदेश सहसंयोजक विकासजी पाटील आणि कोकण विभाग संयोजक किशोर पाटील यांनी शिक्षकांच्या विविध समस्या मांडल्या. यावेळी शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले, अधीक्षक संजय राऊत तसेच वरिष्ठ लिपीक नगराळे यांनीही समस्या समजून घेतल्या.

विविध शाळेतील प्रलंबित मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक मान्यता 4 मार्च पर्यंत देण्यात यावेत. सातत्याने सह्यांचे अधिकार देऊन सेवा जेष्ठ शिक्षकाला पदोन्नती पासून वंचित ठेवण्यात येत असल्यामुळे सह्याचा अधिकार फक्त जास्तीत जास्त सहा महिन्यासाठी देऊन रिक्त पदावर त्वरित सेवा जेष्ठतेनुसार सेवाजेष्ठ शिक्षकास पदोन्नतीने नियुक्ती देण्यात यावी अशा प्रकारचे आदेश संस्थाचालकांना देण्यात यावे व तसे पत्र काढावे. तसेच सेवाज्येष्ठता संदर्भातील शासन परिपत्रक 28.01.2025 ची अंमलबजावणी तातडीने करावी. अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे ताडीने समायोजन करण्यात यावे. रात्र शाळेतील अतिरिक्त अर्धवेळ शिपाई यांना 17 मे,2017 नुसार पुर्णवेळ करणे किंवा प्रयोगशाळा सहायक पदाच्या पदोन्नतीस मान्यता देणे. प्रलंबित शालार्थ आय डी प्रकरणे तात्काळ निकाली काढावेत. बहुप्रतीक्षित पुरवणी बील व मेडिकल बील तात्काळ अदा करणे. ज्याचे पेंडिंग असतील ते त्वरित दिले जावे. वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्तावास मान्यता दिनांक पाच मे पर्यंत देण्यात यावे. अनुकंपा तत्वावरील नियुक्त कर्मचाऱ्यांना मान्यता ज्या बाकी असतील त्या लवकर दिल्या जाव्यात.कला शिक्षकांना ए. एम वेतन श्रेणी देताना शाळेची एक बी. एड ची जागा जाते हा भ्रम चुकीचा असून कला व क्रीडा शिक्षक हे स्पेशल शिक्षक असून त्यांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार वेतन्नोती देण्यात येते ती आपण विनाअट द्यावी या विषयी चर्चा झाली. शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रक्रिया तातडीने राबवली जाईल असे यावेळी शिक्षणाधिकारी ललिता दहीतुले यांनी आश्र्वासित केले.

सभेचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भाजपा शिक्षक आघाडीचे कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलकर यांनी केले यावेळी अधिक्षक संजय राऊत, वरिष्ठ लिपिक नितीन नगराळे, वरिष्ठ लिपिक प्रशांत कसबे, भाजप शिक्षक आघाडी प्रदेश सहसंयोजक विकास पाटील, कोकण विभाग संयोजक किशोर पाटील, कोकण विभाग सहसंयोजक विनोद शेलकर, ठाणे शहर संयोजक प्रा. संभाजी शेळके, भिवंडी विधानसभा सहसंयोजक ज्ञानेश्वर घुगे, जनरल एजुकेशन संचालक राजपूत सर इ . यांच्यासह समस्याग्रस्थ शिक्षक , शिक्षेकेतर कर्मचारी व मावळी मंडळ पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.




नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

## भिवंडी महानगरपालिकेत
# 'सेवा हक्क दिन' कार्यक्रमाचे आयोजन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : शासनाच्या परिपत्रानुसार व मा. प्रशास तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार सोमवार दि.२८/०४/२०२५ रोजी भिवंडी महानगरपालिकेत "सेवा हक्क दिन" कार्यक्रमाचे आयोजन मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. सदर कार्यक्रमा सर्व प्रथम मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके व उप आयुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका एकुण ७० सेवा देतो. या सेवा नागरिकांना देत असतांना संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना वेळेच बंधन असुन त्याच वेळेस नागरिकांना चांगल्या सेवा देणे आवश्यक आहे असे उपस्थित सर्व कर्मचारी व अधिकारी यांना बोलतांना त्यांनी संबोधीत केले. त्यानंतर उपस्थितांना दि.२८ एप्रिल २०२५ रोजी सेवा हक्क दिवसाची शिपथ दिली.

या प्रसगी उप आयुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, शहर अभियंता श्री. जमिल पटेल, उप आयुक्त श्री. शैलेश दोंदे, सहा. आयुक्त (आर.टी.एस) श्री. नितीन पाटील तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग या कार्यक्रमास उपस्थित होते.

# माणसाने माणसांसाठी रक्तदान करावे - डॉ. कैलास पवार

## दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना रक्तदान शिबिरातून श्रद्धांजली




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / ठाणे : रक्त कोणत्याही फॅक्टरीत तयार होत नाही, माणसानेच माणसासाठी रक्तदान करणे आवश्यक आहे. रक्तदान ही खरी मानवतेची सेवा आहे. असे कार्यक्रमाचे मुख्य अतिथी ठाणे सिव्हिल रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. कैलाश पवार यांनी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शिव परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विनय कुमार सिंह यांचे मार्गदर्शनाखाली ठाण्यात आयोजित रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी ॲडव्होकेट विनय कुमार सिंह यांनी सांगितले की, "रक्तदान हा सर्वोच्च मानवसेवा आहे. प्रत्येक निरोगी व्यक्तीने दर तीन महिन्यांनी रक्तदान केले पाहिजे. समाजात रक्तदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून, अधिकाधिक लोकांनी पुढे येऊन रक्तदान करावे."

या रक्तदान शिबिरात शिव परिवार प्रमुख पंडित राम मिलन शुक्ला, डॉ. अजय सिंह, संस्कार क्लासेसच्या संचालिका श्रीमती लक्ष्मी मौर्या, प्रधानाचार्य श्रीमती मनीषा सिंह, मुख्याध्यापक कुंवर राकेश सिंह तोमर, प्रसिद्ध भोजपुरी गायक सोनू सिंह सुरीला, ॲडव्होकेट शिक्षा संस्कार, समाजसेवक राकेश देवरे, सूरज उपाध्याय, आशीष सिंह, तरुण सिंह, लोगी ठाकुर यांसह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून शहीद जवानांना आदरांजली अर्पण करण्यासोबतच रक्तदानाबाबत जनजागृतीही करण्यात आली. उपस्थित सर्वांनी रक्तदान करून मानवतेच्या सेवेचा संकल्प केला.

# डोंबिवलीत महिलांकरिता कामगार नोंदणी प्रमाणपत्र उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : महिलांनी स्वावलंबी व्हावे, आर्थिकदृष्या सक्षम व्हावे हा उद्देश समोर ठेवून माजी नगरसेवक तथा शिवसेना उपशहर संघटक रणजित जोशी यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अनोखा उपक्रम हाती घेता. सोमवारी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात घरकाम मजदुर महिला व रिक्षा चालक महिलांसाठी कामगार नोंदणी सर्टिफिकेट उपक्रम केला. या उपक्रमत गरजू महिलांनी हजेरी लावून कामगार नोंदणी अर्ज भरून या योजनेचा फायदा घेतला.

पश्चिम विभागात शास्त्रीनगर, देवी चौक येथील जोशी यांच्या जनसंपर्क कार्यालयात माजी नगरसेविका वृषाली जोशी यांनी या उपक्रमाची सविस्तर माहिती गरजू महिलांनी दिली. त्याप्रमाणे रिक्षा योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळण्यास मदत होते. यामध्ये महिलांसाठी मोफत रिक्षा ड्रायव्हिंग कोर्स तसेच खरेदीसाठी सबसिडी शासकीय प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्यात आली. तसेच घर काम करणाऱ्या मजदुर महिलांकरिता कामगार नोंदणी सर्टिफिकेट अर्ज भरून घेण्यात आले. या उपक्रम अंतर्गत आरी वर्क कोर्स व फॅब्रिक पेंटिंग कोर्स महिलांसाठी मोफत ठेवण्यात आले होते त्याचाही फायदा महिलांनी घेतला. शिवाय महिलांसाठी खास गार्नियर कंपनीच्या हेअर कलर मोफत ठेवण्यात आला होता त्याचा फायदाही सुमारे चारशे महिलांनी घेतला. महिलांचे असे आवडते उपक्रम यशस्वी होण्यासाठी शाखाप्रमुख वैशाली पेणकर, उपशाखाप्रमुख ज्योती औटी, अश्विनी आनंद, जान्हवी बापर्डेकर यांचं विशेष योगदान लाभलं.

# शाहीर- शितल साठेंचा समाजप्रबोधनपर कार्यक्रम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : अनुसूचित जाती/जमाती आरक्षण बचाव समिती महाराष्ट्र राज्य,अध्यक्ष-पंकज गायकवाड यांच्या विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त भिवंडी येथे रविवार दिनांक- 27/04/2025 रोजी संध्याकाळी 07 ते रात्री 10 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्यातील सुप्रसिद्ध शाहिर- शितल साठे सह शाहिर-सचिन माळी यांचा शाहिरी समाजप्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या शाहिरी समाजप्रबोधनपर कार्यक्रमात शिव,शाहू,फुले व आंबेडकर तसेच राष्ट्र भक्तिपर गीतांचा शाहिरी कार्यक्रम सादर करण्यात आला.हा केवळ गायन मनोरंजनाचा कार्यक्रम न करता आदर्श समाजसुधारकांच्या कार्यांचा वैचारिक गुणगौरवात्मक समाजप्रबोधनपर कार्यक्रम हा मुख्य उद्देश आयोजकांच्या दृष्टीकोनातून होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवरांमध्ये रूपेश म्हात्रे (माजी आमदार),सुभाष माने, मनोज गगे (शिवसेना शहरप्रमुख),रितेश टावरे,गणेश गुळवी (अध्यक्ष-भि.ता.रा.कॉ.), पत्रकार विजय गायकवाड,मोनिका कांबळे (अध्यक्ष-खुशी फाऊंडेशन),फिरोज शेख(अध्यक्ष-अल्पसंख्याक मा.),उमेश सोनावणे (सामाजिक कार्यकर्त्ये) आदिंची अपस्थिती होती. सदर कार्यक्रमात महिलांना पैठणी साड्या देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा.किरण थोरात यांच्याकडून करण्यात आले.अशा प्रकारे बहुसंख्य जनसमुदायाच्या उपस्थितीने शाहिरी-समाजप्रबोधनपर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम संपन्न झाला.

# डॉ. हरीश शेट्टी यांनी पालकांना केले मार्गदर्शन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आर्य ग्लोबल ग्रुप ऑफ स्कूल्सने "आजच्या जगासाठी प्रभावी पालकत्व" या वार्षिक चर्चासत्रात, मानसिक आरोग्यामधील भारतातील प्रसिद्ध मोटिवेशनल लेक्चरर डॉ. हरीश शेट्टी यांचे सेमिनार अत्रे रंग मंदिर, कल्याण (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आले होते.

अनेक दशकांचा अनुभव असलेले प्रख्यात मानसोपचारतज्ञ डॉ. हरीश शेट्टी, त्यांच्या कार्यासाठी आणि मानसिक आरोग्य आणि निरोगीपणाबद्दलच्या अंतर्दृष्टीबद्दल संपूर्ण भारतभर प्रसिद्ध आहेत. एक करिष्माई वक्ते, डॉ. शेट्टी यांनी त्यांच्या प्रगल्भ अनुभवाच्या मिश्रणाने, व्यावहारिक सल्ला आणि विनोदाच्या अद्भुत भावनेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले ज्यामुळे सर्वात कठीण विषय देखील सुलभ रीत्या समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आर्य ग्लोबल ग्रुप ऑफ स्कूल्समधील 60 विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन विष्णु सहस्रनाम हे एक शक्तिशाली आणि प्राचीन प्रार्थना जी शांतता आणि सकारात्मकतेसाठी ओळखली जाते तिचे आयोजन करण्यात आले होते.

परंपरेनुसार, आर्य ग्लोबल ग्रुप ऑफ स्कूल्स आर्य गुरुकुल, कल्याण आणि अंबरनाथ आणि सेंट मेरी हायस्कूल, कल्याणचा समावेश असलेले पालकांना संबोधित करण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी दरवर्षी डॉ. शेट्टींना आमंत्रित करतात. त्यांची सत्रे नेहमीच उत्सुकतेने अपेक्षित असतात, त्याच्या विनोदी कौशल्याने अनेकदा वास्तविक जीवनातील आधारित असतात ते आज 3 तासांचे सेशन झाले.

प्रारंभी, प्राचार्या राधामणी अय्यर यांनी पुष्टी केली की आपण अनेकदा समस्यांचे जटिल निराकरण कसे शोधतो, तर भारतीय संस्कृतीमध्ये कोणत्याही समस्येचा सामना करण्यासाठी अनेक पद्धती आहेत- सामूहिक नामजप त्यापैकी एक आहे. आर्यग्लोबल शाळा केवळ कर्तृत्ववानच नव्हे तर चांगल्या व्यक्तींना वाढवण्याचे उद्दिष्ट कसे ठेवतात यावर त्यांनी भर दिला.

विश्वा शिबिरातील मादुरी राव यांनी अध्यात्म आणि मानसिक आरोग्य यांच्यातील संबंधाचा पुनरुच्चार केला, तर राजेश भुरा यांनी आर्यग्लोबल आपल्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता कशी सुनिश्चित करते याचे कौतुक केले. त्यांचे अनोखे 'चक्रव्यू'- बस ट्रॅकिंग ॲप हे सुनिश्चित करते की आर्यग्लोबलच्या पालकांना काळजी करण्याची गोष्ट शिल्लक राहत नाही असे सांगितले. समुपदेशकांनी त्यांचा अहवाल सादर केला आणि सामायिक केले की 2024-25 या वर्षात अंदाजे 500 विद्यार्थ्यांना समुपदेशनासाठी संदर्भित केले गेले आहे, ज्यामुळे पालकांमध्ये मानसिक आरोग्याच्या महत्त्वाबद्दल जागृतता आणि स्वीकृती दिसून आली.




# अंबिवली रेल्वे प्रवाशांच्या समस्या : रेल्वे प्रशासनाला साकडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : अंबिवली रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी जोरदार मागणी अंबिवली रेल्वे प्रवासी संघटनेचे प्रतिनिधी दीपक सकपाळ यांनी केली आहे. यासाठी कल्याण-कसारा-कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनगाव व सरचिटणीस श्याम उबाले यांना त्यांनी लेखी निवेदन सादर केले.

अंबिवली स्थानकावरील पत्र्यांची अवस्था अत्यंत खराब असून पावसाळ्यात संपूर्ण प्लॅटफॉर्म गळतीमुळे ओला होतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी पत्र्यांची तातडीने दुरुस्ती वा बदल करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्थानकासाठी मंजूर झालेले सीसीटीव्ही कॅमेरे अद्याप बसविण्यात आलेले नाहीत, त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे या कॅमेऱ्यांची त्वरित बसवणी करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्थानकावर स्वच्छतागृह, मुतारी आणि पिण्याच्या पाण्याची कोणतीही योग्य व्यवस्था नाही. शहाड स्टेशनवर जसे नविन फॅन व बाकडे बसविले गेले आहेत, तसेच अंबिवली स्थानकावरही लावण्यात यावेत, अशी मागणी प्रवाशांकडून झाली आहे. शहाड स्टेशनवर झालेली चांगली विद्युत रोषणाई अंबिवली येथे मात्र दिसून येत नाही. अंधारामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, म्हणून पर्याप्त लाइट्स लावाव्यात, असेही सकपाळ यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले.

अंबिवली स्थानकावर स्वच्छतेचा अभाव असून परिसरात नियमित साफसफाई होणे आवश्यक आहे. तसेच स्थानकावरून लोकलमध्ये चढताना किंवा उतरताना प्रवाशांना मोठ्या अंतराचा सामना करावा लागतो. त्यामुळे कल्याण स्थानकावर सुरू असलेल्या प्लॅटफॉर्म उंची वाढविण्याच्या धर्तीवर अंबिवली स्थानकाचीही प्लॅटफॉर्म उंची वाढवावी, अशीही सकपाळ यांनी जोरदार मागणी केली आहे.

याशिवाय, अंबिवली स्टेशनवर बदलापूरप्रमाणे गर्दीच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रवेश आणि निर्गमन व्यवस्था करावी, नवीन तिकीट खिडकी सुरू करावी, तसेच प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर असलेला सरकता जिना टिटवाळा दिशेकडून हलवून प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर बसवावा, अशीही सूचना देण्यात आली आहे. प्रवाशांना सोयीस्कर तिकीट सेवा मिळावी यासाठी स्टेशनवर अधिक एटीव्हीएम मशिन्स लावाव्यात, असेही त्यांनी नमूद केले आहे.

रेल्वे रूळांमध्ये सुरक्षा वाढवण्यासाठी बॅरिकेड्स बसविणे, महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी जीआरपी व आरपीएफ महिला अधिकारी तैनात करणे, तसेच प्रवाशांशी अयोग्य वर्तन करणाऱ्या स्थानक कर्मचाऱ्यांना तंबी देणे या मुद्द्यांचा देखील निवेदनात समावेश आहे. शहाड आणि अंबिवली स्थानकावर होणाऱ्या सुविधांतील दुजाभावाबाबतही तक्रार नोंदवून या संदर्भात रेल्वे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करावा, अशी मागणी सकपाळ यांनी केली आहे. दीपक सकपाळ यांच्या या पुढाकारामुळे अंबिवली प्रवाशांच्या समस्या प्रकाशझोतात आल्या असून रेल्वे प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी, अशी जोरदार अपेक्षा प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024